मराठी
# न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल

बातमी व जाहीराती साठी संपर्क साधा!
: ९८३४१३८४८२



# सहायक आयुक्त अविनाश शिंदे यांची बदली, नागपूरात अपर जिल्हाधिकारी या पदावर पदोन्न्ती

## नागपूर विभागातील प्रादेशिक विभागीय चौकशी अधिकारी पदाची जबाबदारी देण्यात आली आहे.



**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपरी-चिंचवड महापालिकेतील सहायक आयुक्त अविनाश शिंदे यांना नागपूर येथे अपर जिल्हाधिकारी या पदावर सोमवारी (दि. २०) पदोन्नती देण्यात आली आहे. त्यांच्याकडे नागपूर विभागातील प्रादेशिक विभागीय चौकशी अधिकारी पदाची जबाबदारी देण्यात आली आहे.

शिंदे यांची पिंपरी चिंचवड महापालिकेमध्ये सहायक आयुक्त म्हणून नियुक्ती झाली होती. सुरुवातीला त्यांच्याकडे भूमी जिंदगी विभागाचा कार्यभार होता. त्यानंतर दीड वर्षांपूर्वी त्यांच्याकडे महापालिकेच्या कर संकलन विभागाची जबाबदारी सोपविण्यात आली होती. कमी वेळेत जास्त कर वसूल करण्याची कामगिरी त्यांनी पार पाडली. तसेच त्यांच्याकडे महापालिका निवडणूक विभागाचा देखील पदभार होता. महापालिका निवडणुकीसाठी प्रारुप प्रभागरचना त्यांच्या नेतृत्वाखाली झाली. तसेच अंतिम प्रभागरचना, मतदार याद्यांचे कामकाज देखील त्यांनी सुरू केले होते. दरम्यान, सोमवारी त्यांची पदोन्नती झाली असून नागपूर येथे प्रादेशिक विभागीय चौकशी अधिकारी म्हणून त्यांची नियुक्ती करण्यात आली आहे.

शिंदे यांची पिंपरी चिंचवड महापालिकेमध्ये सहायक आयुक्त म्हणून नियुक्ती झाली होती. पिंपरी-चिंचवड महापालिके सुरुवातीला त्यांच्याकडे भूमी जिंदगी विभागाचा कार्यभार होता. तील सहायक आयुक्त अविनाश शिंदे यांना नागपूर येथे अपर जिल्हाधिकारी या पदावर पदोन्नती देण्यात आली आहे. त्यांच्याकडे नागपूर विभागातील प्रादेशिक विभागीय चौकशी अधिकारी पदाची जबाबदारी देण्यात आली आहे.

# मागील दोन दिवाळीत 173 ठिकाणी आगीच्या घटना; नागरिकांनी घ्यावी काळजी, अग्निशमन विभागाचे आवाहन

## पिंपरी-चिंचवड अग्निशमन विभाग सज्ज; फॅन्सी फटाके टाळा, पर्यावरणपूरक फटाक्यांचा वापर करा अशी सूचना



**पिंपरी | प्रतिनिधी**

दिवाळीचा सण म्हणजे आनंद, प्रकाश आणि फटाक्यांचा जल्लोष; मात्र हा आनंद काही क्षणातच दुर्घटनेत बदलत असल्याचे वास्तव अग्निशमन विभागाच्या आकडेवारीतून स्पष्ट झाले आहे. मागील दोन वर्षांत ऐन दिवाळीच्या काळात तब्बल 173 ठिकाणी आगीच्या घटना नोंदवल्या गेल्या असून, यातील बहुतेक घटना फॅन्सी रॉकेट्स आणि उडणाऱ्या फुलबाज्यांमुळे झाल्याचे समोर आले आहे

या पार्श्वभूमीवर पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या अग्निशमन विभागाने या वर्षी सर्वतोपरी तयारी केली आहे. दिवाळी सणाच्या काळात अधिकारी आणि कर्मचाऱ्यांच्या सुट्ट्या रद्द करण्यात आल्या आहेत. फटाक्यांमुळे लागणाऱ्या आगींच्या घटनांना प्रतिबंध करण्यासाठी प्रत्येक अग्निशमन केंद्राला सज्ज ठेवण्यात आले असून नागरिकांनी देखील खबरदारी घेण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

दिवाळीच्या काळात झालेल्या आगींमध्ये घर, दुकाने, गोदामे आणि वाहनांचे मोठे नुकसान झाले आहे. विशेष म्हणजे लक्ष्मीपूजनच्या रात्री अग्निशमन विभागाला सर्वाधिक आपत्कालीन कॉल प्राप्त झाल्याची नोंद आहे. या दिवशी फटाक्यांची आतषबाजी आणि गर्दीमुळे आगीचा धोका वाढतो. छोटी चूकही मोठ्या दुर्घटनेत रूपांतरित होते. त्यामुळे दिवाळीचा आनंद घेत फटाके उडवताना विशेष काळजी घेणे आणि अग्निशमन विभागाच्या सूचनांचे पालन करणे अत्यावश्यक असल्याचे आवाहन अधिकाऱ्यांनी केले आहे.

### पर्यावरणपूरक फटाके वापरावेत

**» परवानगी नसलेले आणि फॅन्सी फटाके दिवाळीत धोक्याचे ठरत आहेत. फुलबाज्या, रॉकेट, चक्र आणि 'फॅन्सी शो' सारखे फटाके आकर्षक वाटत असले तरी याच फटाक्यांमुळे आगीच्या घटना घडत आहेत. अनेक वेळा रॉकेट उडवताना नागरिक सुरक्षित अंतर राखत नाहीत. उंच इमारतींच्या बाल्कनीत, कपड्यांवर किंवा गॅस सिलिंडरजवळ पडल्याने काही सेकंदांत आग भडकते. निष्काळजीपणामुळे मोठ्या दुर्घटना घडू नयेत म्हणून अग्निशमन विभागाने परवानगी नसलेले फटाके टाळण्याचे आणि फक्त सुरक्षित, पर्यावरणपूरक फटाके वापरावेत, असे आवाहन केले आहे.**

# "अजित पवार मुख्यमंत्री झाले, तोच दिवस जनतेसाठी खरी दिवाळी" : अण्णा बनसोडे

## उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी पुणे आणि पिंपरी चिंचवड शहराच्या दोन्ही महापालिका ताब्यात घेण्याचा निर्धार केला आहे.

**पिंपरी | प्रतिनिधी**

राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार मुख्यमंत्री पदावर विराजमान झाले, तोच दिवस राज्यातील जनतेसाठी खरी दिवाळी ठरेल, असं वादग्रस्त विधान विधानसभेचे उपाध्यक्ष अण्णा बनसोडे यांनी केलं आहे. पिंपरी चिंचवडमध्ये सफाई कामगारांसोबत दिवाळी साजरी करण्याच्या कार्यक्रमात ते बोलत होते.

बनसोडे म्हणाले, "राज्याला स्थिर, विकासाभिमुख आणि सर्वसामान्यांचा विचार करणारे नेतृत्व हवं आहे. अजित दादा पवार हेच त्या भूमिकेसाठी योग्य आहेत. जेव्हा ते मुख्यमंत्री होतील, तेव्हाच जनतेला खरी दिवाळी लाभेल."



अण्णा बनसोडे हे अजित पवारांचे कट्टर समर्थक मानले जातात. त्यामुळे त्यांच्या या वक्तव्यामागे राजकीय हेतू असल्याची चर्चा रंगली आहे. या विधानानंतर भाजप आणि राष्ट्रवादी काँग्रेसमधील अंतर्गत मतभेद पुन्हा एकदा चव्हाट्यावर आले आहेत.

राज्याच्या सत्ताधारी महायुतीत गेल्या काही दिवसांपासून तणावाचे वातावरण असून, बनसोडेंच्या या विधानाने तो तणाव आणखी वाढण्याची शक्यता राजकीय वर्तुळात व्यक्त केली जात आहे. बनसोडे म्हणाले, "राज्याला स्थिर, विकासाभिमुख आणि सर्वसामान्यांचा विचार करणारे नेतृत्व हवं आहे. अजित दादा पवार हेच त्या भूमिकेसाठी योग्य आहेत. जेव्हा ते मुख्यमंत्री होतील, तेव्हाच जनतेला खरी दिवाळी लाभेल."

### दबक्या आवाजात बोनस न मिळण्याची चर्चा...

» विधानसभेचे उपाध्यक्ष आणा बनसोडे यांच्या सोबत दिवाळी साजरी करत असताना सफाई कामगार दबक्या आवाजात बोनस न मिळण्याची चर्चा करत होते.आण्णा बनसोडे यांनी आयकल आणि थेट फोन करत माहिती घेतली.आणि बोनस च्या संदर्भात लवकर निर्णय घेण्याच्या सूचना दिल्या.

# देहूमध्ये शेतकऱ्यांसाठी रोहित पवारांचा एक दिवसीय लाक्षणिक उपोषण

## शेतकऱ्यांना सरसकट कर्जमाफी देण्यात यावी या मागणीसाठी उपोषण करण्यात आलं.

**पिंपरी | प्रतिनिधी**

शेतकऱ्यांना सरसकट कर्जमाफी देण्यात यावी या मागणीसाठी आज आमदार रोहित पवार यांनी एक दिवसीय लाक्षणिक उपोषण करण्यात आलं. यावेळी रोहित पवार यांनी आक्रमक भूमिका घेत कर्जमाफीबाबत आमचा संघर्ष सुरू राहील. सरकारला गुडघे टेकायला भाग पाडू अस मत व्यक्त केलं आहे. आमदार रोहित पवार देहूमध्ये पत्रकारांशी बोलत होते.




आगामी महानगर पालिका निवडणुकीसाठी महायुतीमध्ये ऐकला चलोची भूमिका तिन्ही पक्षांनी घेतल्याचं चित्र दिसत आहे, असं रोहित पवार म्हणाले. एकनाथ शिंदे आणि अजित पवार यांचा पक्षाला कुणकुण लागलेली आहे. भाजपने दोघांना वेगळं लढण्यास सांगितलं असून असे आदेश दिल्लीवरून भाजपला असल्याचं रोहित पवार यांनी सांगितलं. ही भाजपची २०२९ ची तयारी सुरू आहे. दोन्ही पक्षातील आमदार भाजपातील प्रवेश करतील अस भाकीत ही रोहित पवारांनी केलं आहे. पुढे ते म्हणाले, पुण्याची ओळख ही सांस्कृतिक राजधानी म्हणून होती. आता महाराष्ट्रात गुन्हेगारीत आणि भ्रष्टाचारात अव्वल आलं आहे. काही ठराविक लोकांना हे सरकार पोसत आहे. असा आरोप रोहित पवारांनी केला आहे.

बच्चू कडू यांनी केलेल्या वक्तव्याचा रोहित पवारांनी निषेध केला आहे. बच्चू कडू हे आक्रमक नेते आहेत. परंतु, आपण संविधानानुसार चाललं पाहिजे. आमदारांना मारणे, कापा- कापी करणे अशी भाषा त्यांनी करू नये. अस ही रोहित पवारांनी बच्चू कडू यांच्याबाबत ठणकाहून सांगितलं आहे. पुढे ते म्हणाले, पुण्यातील जैन बोर्डिंग प्रकरणात केंद्रिय मंत्री मुरलीधर मोहोळ यांचं नाव चर्चेला आहे. महाराष्ट्रातील महत्वाच्या मंत्र्यांच्या नातेवाईकांची भागीदारी आहे. अस ही रोहित पवार म्हणाले.

गेल्या सप्टेंबर महिन्यात राज्यभरात झालेल्या अतिवृष्टीने शेतकऱ्यांचे मोठे नुकसान झाले. पीक, जनावरे, घरे, शेतजमिनी वाहून गेल्या आणि अनेक शेतकरी संकटात सापडले. या पार्श्वभूमीवर राज्य सरकारने नुकतेच ३२ हजार कोटी रुपयांचे मदत पॅकेज जाहीर केले. मात्र, ही मदत पुरेशी नसल्याची भावना शेतकऱ्यांमध्ये आहे. याच कारणावरून आता राजकारणही तापले आहे. शेतकऱ्यांची सरसकट कर्जमाफीच त्यांच्या पुनर्वसनाचा एकमेव मार्ग असल्याचे रोहित पवार म्हणाले.

उपोषणादरम्यान रोहित पवार म्हणाले, "जगद्गुरू संत तुकाराम महाराजांनी जगातली पहिली कर्जमाफी केली. ती कोणासाठी केली? लोकांसाठी केली. नुकसान आर्थिक कोणाचं झालं? तर सरकारचं नाही त्यांचं झालं. त्यांनी व्यक्तिगत स्वत:चं नुकसान करून घेतलं. त्यांनी माणसांकडे बघताना व्यवहार म्हणून बघितलं नाही तर माणूस म्हणून बघितलं. त्यामुळे त्यांनी जगातील पहिली कर्जमाफी करून दाखवली. त्यानंतर महाविकास आघाडीमध्ये कर्जमाफी केली ती सरसकट केली."

राज्य सरकारवर निशाणा साधत पवार म्हणाले, "आता आजची परिस्थिती जर बघितली तर इथे येणारा प्रत्येक शेतकरी, शेतमजूर मोठ्या आर्थिक संकटात आहे. जे काही विचार संतांनी दिले होते ते बाजूला सारून हे सरकार वेगळेच मनुवादी विचार आणण्याचा प्रयत्न करत आहे."

# दिवाळीत घराघरात आधुनिक रोषणाईची क्रेझ

## पारंपरिक पणत्यांसोबत इलेक्ट्रिक पणत्यांना मोठी मागणी



**पिंपरी | प्रतिनिधी**

दिवाळी सण जवळ आल्याने बाजारपेठेत विद्युत रोषणाईचा झगमगाट झाला आहे. बाजारपेठेत पारंपरिक पणतीपेक्षा नागरिकांनी इलेक्ट्रिक पणतीला पसंती दिल्याचे दिसून येत आहे. पारंपरिक मातीच्या पणत्यांसोबतच यावर्षी इलेक्ट्रिक पणत्या आणि एलईडी दिव्यांचीही जोरदार मागणी दिसून येत आहे. रंगीत प्रकाश, आकर्षक डिझाईन्स आणि कमी विजेचा वापर या वैशिष्ट्यांमुळे ग्राहक या आधुनिक पणत्यांकडे आकर्षित होत आहेत.

लहान आकाराच्या बॅटरीवर चालणाऱ्या पणत्या, संगीतासह प्रकाश बदलणाऱ्या एलईडी पणत्या, तसेच सौरऊर्जेवर चालणाऱ्या पर्यावरणपूरक इलेक्ट्रिक पणत्या अशा विविध प्रकारच्या उत्पादनांनी बाजारपेठ सजली आहे. या आधुनिक पणत्या पारंपरिकतेला आधुनिकतेचा स्पर्श देत घरगुती सजावटीसाठी खास ठरत आहेत.

बाजारात पारंपरिक मातीच्या पणत्यांबरोबर इलेक्ट्रिक दिव्यांचा संगम दिसत असून, सणासुदीचा माहोल अधिक रंगतदार झाला आहे. टिकाऊपणा, सुरक्षितता आणि पुन्हा वापरता येण्याची सोय या कारणांमुळे इलेक्ट्रिक पणत्या केवळ शहरीच नव्हे, तर ग्रामीण भागातही लोकप्रिय ठरत आहेत. दिवाळीच्या सजावटीत पारंपरिक प्रकाशाच्या तेजाला आधुनिक इलेक्ट्रिक रोषणाईची जोड मिळाल्याने यंदाची सणसुदी अधिक झगमगती होणार आहे.

# शनिवारवाड्याच्या आवारात नमाज पठण केल्याप्रकरणी गुन्हा दाखल

## या ठिकाणी मनाई असताना तीन अनोळखी महिलांनी चटई अंथरुण नमाज पठण केले.

**पुणे | प्रतिनिधी**

शनिवारवाड्याच्या आवारात नमाज पठण केल्याप्रकरणी तीन महिलांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.याबाबत पुरातत्त्व विभागाच्या अधिकाऱ्यांनी विश्रामबाग पोलीस ठाण्यात फिर्याद दिली. त्यांनी दिलेल्या फिर्यादीनुसार, तीन अनोळखी महिलांविरुद्ध गुन्हा नोंदवण्यात आला आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, शनिवारवाडा ऐतिहासिक स्मारकात आहे.

या ठिकाणी मनाई असताना तीन अनोळखी महिलांनी चटई अंथरूण नमाज पठण केले. शनिवारी (१८ ऑक्टोबर) दुपारी पावणेदोन ते पाच वाजण्याच्या दरम्यान ही घडली. त्यानंतर पुरातत्त्व विभागाच्या अधिकाऱ्यांनी रविवारी (१९ ऑक्टोबर) उशिरा याबाबत फिर्याद दिली. त्यानंतर या प्रकरण पोलिसांकडून प्राचीन स्मारके, पुरातत्वशास्त्रीय स्मारके आणि अवशेष कायद्यानुसार गुन्हा दाखल केला आहे. पोलीस उपनिरीक्षक पाटील तपास करीत आहेत.

ऐन दिवाळीत शनिवारवाड्याच्या आवारात महिलांनी नमाज पठण केल्याची चित्रफीत प्रसारित झाल्यानंतर भारतीय जनता पक्षाच्या खासदार मेधा कुलकर्णी यांनी समाज माध्यमात प्रतिक्रिया व्यक्त केली होती. त्यानंतर मेधा कुलकर्णी यांच्यासह पतित पावन संघटनाच्या कार्यकर्त्यांनी शनिवारवाड्याच्या आवारात रविवारी आंदोलन केले. शनिवारवाड्याच्या परिसरात कार्यकर्त्यांनी शिववंदना केली.

पुण्याच्या ऐतिहासिक शनिवारवाडा परिसरात नमाज पठण करण्यात आल्याच्या घटनेनंतर शहरात चांगलीच खळबळ उडाली आहे. इतिहासाशी निगडित असलेल्या या पुरातत्त्व वास्तूमध्ये अशा प्रकारची धार्मिक कृती पार पडल्याने प्रशासन आणि पुरातत्त्व विभाग दोघेही सावध झाले आहेत. या प्रकरणी आता विश्रामबाग पोलिस ठाण्यात अज्ञात महिलांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

ही घटना उघडकीस आल्यानंतर भाजप खासदार मेधा कुलकर्णी यांनी या ठिकाणी आंदोलन करत तीव्र निषेध नोंदवला होता. त्यांच्या नेतृत्वाखाली कार्यकर्त्यांनी शनिवारवाडा हा ऐतिहासिक वारसा आहे, धार्मिक ठिकाण नव्हे असं सांगत प्रशासनाकडून कठोर कारवाईची मागणी केली होती. तर जिथं नमाज पठण करण्यात आलंय त्या ठिकाणी गोमूत्रही शिंपडलं होतं. काल शनिवारवाडा परिसरात मोठा गोंधळ पाहायला मिळाला होता. त्यानंतर आता अज्ञात महिलांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

तक्रार प्राप्त होताच पोलिसांनी घटनास्थळाचा पंचनामा केला असून, परिसरातील सीसीटीव्ही फुटेज तसेच मोबाईल व्हिडिओंची तपासणी सुरू केली आहे. पोलिस सूत्रांच्या माहितीनुसार, नमाज पठण करणाऱ्या महिलांची ओळख पटवण्याचे प्रयत्न सुरू आहेत. त्यासाठी पुण्यातील पोलिस सामाजिक माध्यमांवरील व्हिडिओ आणि फोटोचेही विश्लेषण करण्यात येत आहे.



### 'मराठा सम्राज्याचा विस्तार ज्या ठिकाणहून झाला'

**» "शनिवारवाडा जे छत्रपती शिवाजी महाराजांनी हिंदवी स्वराज्य स्थापन केलं. त्या हिंदवी स्वराज्याचा, मराठा सम्राज्याचा विस्तार ज्या ठिकाणहून झाला. त्याचं केंद्र स्थान असलेला शनिवारवाडा आमच्यासाठी ऐतिहासिक भूषण आहे. अशा ठिकाणी मुस्लिमांच्या काही गटांनी काही मुस्लिम महिलांनी प्रामुख्याने या ठिकाणी शुक्रवारी नमाज पठण केल्याच लक्षात आलय" असं खासदार मेधा कुलकर्णी म्हणाल्या.**

### जातीय तेढ निर्माण करु नये

**» 'शनिवारवाडा हा मराठा साम्राज्य तसेच पेशव्यांनी दाखविलेल्या शौर्याचे प्रतीक आहे. पुण्यात सर्व जातीधर्माचे बांधव गुण्यागोविंद्याने राहतात. मेधा कुलकर्णी या खासदार आहेत. याचा विसर त्यांना पडला आहे. कोथरूडनंतर त्या कसब्यात येऊन हिंदू-मुस्लिम बांधवांमध्ये तेढ निर्माण करत आहेत. या प्रकरणी कुलकर्णी यांच्यासह कार्यकर्त्यांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात यावा' अशी मागणी राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार) पक्षाच्या प्रवक्त्या रुपाली पाटील ठोंबरे यांनी केली आहे.**

# व्हीआयपी क्रमांकासाठी पुणेकरांचा उत्साह; आरटीओला सव्वादोन कोटींचा महसूल

## वाहन खरेदीबरोबरच आता त्या वाहनांसाठी पसंती क्रमांक घेण्याचीही स्पर्धा रंगली आहे.

**पुणे | प्रतिनिधी**

दिवाळीचा उत्साह सध्या शहरात चांगलाच पाहायला मिळत आहे. वाहन खरेदीबरोबरच आता त्या वाहनांसाठी पसंती क्रमांक (चॉइस नंबर) घेण्याचीही स्पर्धा रंगली आहे. विशेषतः व्हीआयपी क्रमांक, वाढदिवसाच्या तारखांचे क्रमांक किंवा इतर शुभ मानल्या जाणाऱ्या तारखांचे क्रमांक घेण्यासाठी वाहनमालकांचा ओघ आरटीओ कार्यालयात वाढला आहे. परिणामी, प्रादेशिक परिवहन कार्यालयाच्या (आरटीओ) उत्पन्नातही चांगली वाढ नोंदवण्यात आली आहे.

गेल्या दहा दिवसांत तब्बल १ हजाराहून अधिक वाहनमालकांनी पसंती क्रमांकासाठी अर्ज दाखल केले आहेत. आरटीओकडून मिळालेल्या माहितीनुसार, यंदाची ही आकडेवारी मागील दोन वर्षांच्या तुलनेत सर्वाधिक आहे.




केंद्र सरकारकडून वाहनांवरील जीएसटी दरात झालेल्या कपातीमुळे वाहन खरेदीचा वेग वाढला आहे. त्यातच दिवाळीचा शुभमुहूर्त जवळ आल्याने बाजारपेठेत नवीन वाहनांच्या विक्रीला उधाण आले आहे. दसऱ्याच्या दिवशीही गतवर्षीपेक्षा एक हजार कार अधिक विक्री झाल्याचे चित्र दिसले. आता धनत्रयोदशी, लक्ष्मीपूजन, पाडवा आणि भाऊबीज या शुभमुहूर्तांवर वाहन खरेदी करण्याचा ट्रेंड कायम असून, यंदा तब्बल १३ हजारांहून अधिक नवीन वाहनांच्या विक्रीची नोंद झाली आहे.

नवीन वाहन खरेदीसोबत पुणेकरांचा पसंती क्रमांक घेण्याकडे वाढता कल विशेष उल्लेखनीय ठरतो आहे. अनेकजण शुभ अंक, वाढदिवस किंवा लग्नाच्या तारखेवर आधारित क्रमांक निवडण्यास प्राधान्य देत आहेत. काही लोकप्रिय क्रमांकांसाठी तर लिलावातही जोरदार चुरस पाहायला मिळाली. आरटीओच्या आकडेवारीनुसार, पसंती क्रमांकांसाठी यंदा सुमारे सव्वादोन कोटी रुपयांहून अधिक रक्कम वाहनमालकांनी खर्च केली आहे.

# मार्केट यार्डातील फळे, भाजीपाला विभाग गुरूवारी बंद

## सभापती आणि सचिव यांनी शेतकऱ्यांना आवाहन केले



**पुणे | प्रतिनिधी**

येत्या गुरूवारी (दि. २३) भाऊबीज आहे. भाऊबीजच्या पारंपरिक सणानिमित्त पुण्यातील मार्केट यार्डातील फळे, भाजीपाला विभाग, पान विभाग आणि केळी बाजार तसेच मोशी उपबाजार बंद राहणार आहेत.

पुणे कृषी उत्पन्न बाजार समितीच्या सभापती प्रकाश जगताप आणि सचिव डॉ. राजाराम धोंडकर यांनी शेतकऱ्यांना आवाहन केले आहे की, बाजार बंद असल्याने गुरूवारी शेतीमाल विक्रीस आणू नये. तसेच खरेदीदारांनीही या दिवशी खरेदीस येऊ नये.

यापूर्वीच्या वर्षांप्रमाणे भाऊबीजच्या दुसऱ्या दिवशी फुलबाजार बंद राहतो. त्यामुळे यंदा शुक्रवारी (दि. २४) फुलबाजारही बंद राहणार आहे. शेतकरी आणि खरेदीदारांनी या सूचना पाळल्यास बाजारात कोणताही गैरसोय होणार नाही, असे समितीने स्पष्ट केले आहे.

# पिंपरखेड परिसरामध्ये धुमाकूळ घालणारा तिसरा बिबट्या जेरबंद

## बिबट्यांचा बंदोबस्त करण्यासाठी वनविभागाने पिंजरे वाढवावेत, अशी मागणी स्थानिक नागरिकांकडून होत आहे.

**पुणे | प्रतिनिधी**

पिंपरखेड आणि परिसरात बिबट्यांचा धुमाकूळ सुरू असताना, वनविभागाला मृत शिवन्या बोंबे हल्ल्याच्या घटनास्थळाजवळ तिसरा बिबटा जेरबंद करण्यात यश मिळाले आहे. तरीही या परिसरात बिबट्यांची संख्या मोठ्या प्रमाणात असल्याने नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण कायम आहे. बिबट्यांचा बंदोबस्त करण्यासाठी वनविभागाने पिंजरे वाढवावेत, अशी मागणी स्थानिक नागरिकांकडून होत आहे.

पिंपरखेड परिसरातील आंबेवाडी परिसरात शुक्रवारी (दि.17) विश्वास वरे यांचे घराजवळ सुमारे दोन तास बिबट्याने हैदोस घातला. विद्यार्थिनी कल्याणी गाढवे ही सायंकाळी चारच्या सुमारास रस्त्याने जात असताना अचानक रस्त्यावर बिबट्या आला. तिने प्रसंगावधान राखत घराकडे धाव घेत आपला जीव वाचवला. सायंकाळी सहा वाजेच्या सुमारास वडनेर रस्त्यालगत प्रेरणा नरेंद्र बोंबे या शेतात चारा काढत असताना हल्ल्याच्या तयारीत असलेल्या बिबट्याला रस्त्याने जाणाऱ्या शालेय विद्यार्थ्यांनी पाहून आरडाओरडा केला. इतर ग्रामस्थांनी धाव घेतल्यानंतर बिबट्याने त्या ठिकाणाहून पळ काढला. शालेय विद्यार्थ्यांच्या आरडाओरड्यामुळे प्रेरणा बोंबे या हल्ल्यातून थोडक्यात बचावल्या.

याच वेळी शेतकरी चंद्रकांत गुंजाळ यांच्या ओट्यावर येऊन बिबट्याने दहशत निर्माण केली. बेस कॅम्पच्या रक्षकांनी बिबट्याला हुसकावले. परंतु, बिबट्या फिरून पुन्हा फुलकोबीच्या शेतात आला. अन्य एका घटनेत सुलोचना वसंत बोंबे या सायंकाळी घरी जात असताना दबा धरून बसलेल्या बिबट्याने जोराची डरकाळी फोडून हल्ल्याचा प्रयत्न केला. भेदरलेल्या सुलोचना यांनी आरडाओरड केल्यानंतर बिबट्या दूर गेला. परंतु, तो डरकाळी फोडतच होता. या घटनेची माहिती मिळाल्यानंतर वन विभागाने पिंजरा लावला. पारगाव परिसरात बिबट्याचा मोठा उपद्रव असल्याने वन विभागाकडून शनिवारी सकाळीच पिंजरा लावण्यात आला. दाभाडे मळा रस्त्यावर बंद असलेल्या वीटभट्टीजवळ दररोज बिबट्या ठाण मांडून असतो. गावठाण ते राम बाबा समाधी स्थळ परिसरात बिबट्याचा वावर असल्याने विद्यार्थी व नागरिकांना जीव मुठीत धरून जावे लागत आहे.



### बिबट्यांची संख्या आणि नागरिकांची चिंता

» पिंपरखेड परिसरात आतापर्यंत तीन बिबटे जेरबंद झाले असले, तरी या भागात बिबट्यांची संख्या मोठ्या प्रमाणात असल्याचे स्थानिकांचे म्हणणे आहे. वनविभागाने बिबट्यांचा बंदोबस्त करण्यासाठी मोहीम हाती घेतली असली, तरी पिंजऱ्यांची संख्या अपुरी असल्याने ही मोहीम यशस्वी होईल का, असा प्रश्न नागरिक उपस्थित करत आहेत. बिबट्यांच्या वाढत्या संख्येमुळे परिसरात भीती कायम असून, वनविभागाने अधिक पिंजरे लावून तातडीने कारवाई करावी, अशी मागणी होत आहे.

### शिवन्या बोंबे हल्ल्याने भीतीचे वातावरण

» आठ दिवसांपूर्वी पिंपरखेड येथे बिबट्याच्या हल्ल्यात चिमुरडी शिवन्या बोंबे हिचा मृत्यू झाल्याने परिसरात प्रचंड खळबळ उडाली होती. या घटनेनंतर संतप्त नागरिकांनी रास्तारोको आंदोलन करत वनविभागाच्या अधिकाऱ्यांना धारेवर धरले होते. पिंपरखेड आणि आसपासचा परिसर बिबटमुक्त करण्याची मागणी करत नागरिकांनी तीव्र नाराजी व्यक्त केली होती.

### वनविभागाची कारवाई

» बिबट्यांचा बंदोबस्त करण्यासाठी वनविभागाने पिंपरखेड परिसरात 10 पिंजरे लावले आहेत. यापैकी मृत शिवन्या बोंबे हल्ल्याच्या घटनास्थळाजवळ लावलेल्या पिंजऱ्यात शनिवारी (18 ऑक्टोबर 2025) रात्री एक बिबटी जेरबंद झाली. ही सहा वर्षांची मादी बिबटी असून, तिला माणिकडोह बिबट्या निवारण केंद्रात पाठवण्यात आले आहे, अशी माहिती वनपरिक्षेत्र अधिकारी निळकंठ गव्हाणे यांनी दिली.

# इंदापूरच्या राजकारणात आरक्षणाचा डावपेच ; सभापतीपदासाठी हर्षवर्धन पाटलांचा 'मास्टर प्लॅन' कोणाला देणार धक्का?

## पंचायत समितीच्या पंचवार्षिक निवडणुकीसाठी आरक्षणाची गणिते विचित्र झाल्याने,माजी मंत्री हर्षवर्धन पाटील यांनी वेगळा नवा प्लॅन आखला

**पुणे | प्रतिनिधी**

राज्याचे माजी सहकार मंत्री व राष्ट्रवादी काँग्रेसचे शरदचंद्रजी पवार पक्षाचे नेते हर्षवर्धन पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली,कित्येक वर्षांपासून इंदापूर पंचायत समितीची सत्ता राहिली आहे. परंतु काही दिवसावर येऊन ठेपलेल्या,पंचायत समितीच्या पंचवार्षिक निवडणुकीसाठी आरक्षणाची गणिते विचित्र झाल्याने,माजी मंत्री हर्षवर्धन पाटील यांनी वेगळा नवा प्लॅन आखला असून,हा नवा प्लॅन कोणा कोणाला हादरा देणार का? याची चर्चा इंदापूर तालुक्यातील गावोगावी रंगली आहे.

यासंदर्भात अधिक माहिती अशी की, दीपावलीचा सण पार पडताच, इंदापूर तालुक्यासह राज्यभर राजकीय फटाके वाजणार आहेत. यामध्ये जिल्हा परिषद,पंचायत समिती या निवडणुका नगरपरिषदेच्या,नगरपालिकेच्या अगोदर पूर्ण होतील.अशी शक्यता आहे. इंदापूर तालुक्यात पंचायत समितीसाठी सोळा (गण) जागा असून,अनुसूचित जातीसाठी सभापतीपद आरक्षित झाले आहे. त्यामुळे मतदारांच्या संख्येने मोठे असणारा मराठा,धनगर व इतर समाज पंचायत समितीच्या निवडणुकीकडे पाहिजे त्या प्रमाणात पाहणार नाही.

असे असले तरी देखील,राज्याचे कृषिमंत्री दत्तात्रय भरणे यांच्या बाले किल्लातील वालचंदनगर, लासुर्णे, सणसर या तिन्ही गणात, पंचायत समितीच्या सभापतीपदाची निवडून आलेल्या उमेदवाराला लॉटरी लागणार आहे. यावर मात करण्यासाठी,माजी मंत्री हर्षवर्धन पाटील यांनी नव्याने राजकीय प्लॅनिंग केले.



### तालुक्यांत विचित्र आघाडी होणार का ?

» पंचायत समिती,जिल्हा परिषद नगरपालिका,या निवडणुका काही दिवसातच वाऱ्याच्या वेगाने होणार आहेत. इंदापूर विधानसभेला तिरंगी झाली,यामध्ये कृषिमंत्री दत्तात्रय भरणेविजय ठरले,माजी मंत्री हर्षवर्धन पाटील व भाजप नेते प्रवीण माने एकत्र असते तर वेगळे चित्र पाहण्यास मिळाले असते. हे गावागावातील कार्यकर्त्यांना कळाले आहे.जर प्रवीण माने व हर्षवर्धन पाटील एकत्र आले तर,जिल्हा परिषद पंचायत समिती व इतर निवडणुका सोप्या नाहीत.त्यामुळे स्थानिक पातळीवर हर्षवर्धन पाटील व प्रवीण माने एकत्र येतील, अशी चर्चा रंगली आहे.